## नियमित दिवाणी दावा क्र. ६३/२०२०

## (शेखर मुकुंद गांवकर वगैरे वि. महादेव केशव गावंकर)

## नि.१३ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज त्रयस्थ अर्जदार शशिकांत विनायक पेडणेकर यांनी दाव्यामध्ये पक्षकार म्हणून सामील करुन घेणेबाबत दाखल केलेला आहे.

२. त्यांचे कथनांप्रमाणे वादीने प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीचे सरस निरस वाटप होऊन वादींना त्यांच्या हिश्श्याचे वाटप मिळणेकरीता व दावा मिळकत क्र.१ व २ चे सरस निरस धडेवाटप झालेखेरीज, स्वतंत्र कब्जे झालेखेरीज प्रतिवादी याने कोणत्याही प्रकारचे सपाटीकरण किंवा कोणत्याही प्रकारचे त्रयस्थ असामींचे हक्कसंबंध निर्माण करु नये अशी कायमची ताकिद होण्याकरीता दाखल केलेला आहे. त्यांचे पुढे असे कथन आहे की, त्रयस्थ अर्जदार व प्रतिवादी क्र.१ यांचेदरम्यान दावा मिळकत अ.क्र.१ संदर्भात खरेदी–विक्रीचा व्यवहार झालेला असून त्रयस्थ अर्जदार यांनी प्रतिवादी क्र.१ यांना सदर मिळकती प्रतिगुंठा रक्कम रु.५५,०००/– प्रमाणे विक्रीत द्यावयाचे ठरविलेले आहे व त्यास अनुसरुन त्रयस्थ अर्जदार यांनी वेळोवेळी रोख स्वरुपात रक्कम रु.७५,०००/– व धनादेशाद्वारे रक्कम रु. २,००,०००/– प्रतिवादी क्र.१ यांना अदा केलेली आहे. सदर व्यवहाराच्यावेळी प्रतिवादी क्र.१ यांनी सदरची मिळकत सामाईक स्वरुपात आहे व त्या मिळकतीचे कायदेशीर वाटप झाल्यावर त्रयस्थ अर्जदार यांना सदर मिळकतीचा पुढील खरेदी–विक्रीचा व्यवहार पूर्ण करणेची हमी देखील त्रयस्थ अर्जदार यांना दिलेली आहे. दाव्यात नमुद मिळकती संदर्भात त्रयस्थ अर्जदार हे हितसंबंधीत व्यक्ती आहेत व त्यांना दाव्याचे कामी सामील करुन घेतलेशिवाय दाव्याचा न्यायोचित निर्णय होणारा नाही. किंबहुना त्रयस्थ अर्जदार यांनी दाव्यात नमुद विषयास अनुसरुन व मिळकतीसंदर्भात आवश्यक त्या जाहीर नोटीसा व पत्र व्यवहार केलेले आहेत. सबब प्रस्तुत दाव्याचा न्यायोचित निर्णय होण्याकरीता त्रयस्थ अर्जदार यांना प्रतिवादी सदरात

सामील करणे आवश्यक व क्रमप्राप्त आहे. त्रयस्थ अर्जदार हे प्रस्तुत दाव्याचे कामी आवश्यक व योग्य पक्षकार आहेत. त्यांना दाव्याचे कामी प्रतिवादी सदरात समाविष्ठ करुन न घेतल्यास त्यांच्या न्यायहक्कांवर गदा येणारी असून त्यांचे अपरिमित स्वरुपाचे नुकसान होणारे आहे. त्यामुळे त्रयस्थ अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत येऊन त्यांना प्रतिवादी सदरात सामील करणेबाबत जरुर ते न्यायोचित आदेश पारीत करणेबाबत त्यांनी विनंती केलेली आहे.

३. प्रस्तुत अर्जास नि.२३ कडे प्रतिवादी क्र.१ यांनी आपले म्हणणे दाखल करुन हरकत नोंदविलेली आहे. त्यांचे असे कथन आहे की, त्रयस्थ अर्जदार यांचा अर्ज खोटा, खोडसाळ असून मजकूर पूर्ण तथाकथीत आहे. याउलट त्रयस्थ अर्जदार यांना नोकरांचा पगार देण्याकरीता हात उसणे म्हणून रक्कम रु. दोन लाख प्रतिवादी यांचेकडून परत देण्याच्या अटीवर घेतलेले होते व तीच रक्कम त्यांचे खातेवर अर्जदार यांनी एनईएफटीद्वारे अदा केलेली आहे. त्यांचेमध्ये कोणताही लेखी अगर तोंडी व्यवहार अगर बोलणी झालेली नाही व तशी कोणतीही हमी दिलेली नाही. त्रयस्थ अर्जदार यांनी दिलेल्या जाहीर नोटीसीस प्रतिवादी क्र.१ जबाबदार नाहीत. त्यास प्रतिवादी यांनी खुलासा करणारे उत्तर दिलेले आहे. त्रयस्थ अर्जदार यांनी दि.२०/०७/२०१७ रोजीची पावती दावा मिळकती संदर्भातील नाही. सदरची रक्कम प्रतिवादी क्र.१ यांनी अर्जदार यांना परत केलेली आहे. दावा मिळकतीसंदर्भात प्रतिवादी क्र.१ यांनी अर्जदारासोबत कोणताही खरेदी–विक्रीचा लेखी अगर तोंडी करार केलेला नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज चालणेस पात्र नाही. त्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

४. वादी यांनी नि.२५ कडे आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत नोंदविलेली आहे. वादीने अर्जातील सर्व कथने नाकारलेली असून अर्जदार व अन्य प्रतिवादी यांनी संगनमत करुन प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे असे कथन केलेले आहे. तसेच

सदरचा अर्ज केवळ दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकणेकरीता दाखल करण्यात आलेला असून तोच अर्जदार व अन्य प्रतिवादी यांचा हेतू आहे. अर्जदार यांचा दावा मिळकतीशी कोणताही हक्कसंबंध नाही. अर्जातील प्रतिपादनांच्या पुष्ठ्यर्थ कोणताही ठोस किंवा विश्वसनीय कागदोपत्री पुरावा न्यायालयात दाखल केलेला नाही. सदर त्रयस्थ अर्जदार यांना कथीत साठेकरारातील शर्तींना व अटींना अनुसरुन प्रतिवादी क्र.१ यांच्या हिश्श्यास येणाऱ्या दावा मिळकतीतील क्षेत्रापैकी जमीन खरेदीखताद्वारे विक्रीत घेण्याचा व त्यांचेविरुध्द कथीत अंमलबजावणी होऊन मिळणेकरीता दावा दाखल करणेचा अधिकार राहील. त्याकरीता त्यांना प्रस्तुत दाव्याचे कामी सामील करुन घेणेची आवश्यकता नाही. त्याकरीता वादी हे ***एल. एस. सदापोपन वि. के. एस. सब्रीनाथन एआयआर २००२ मद्रास २७८*** व ***सरविंदरसिंग वि. दलिपसिंग १९९६(५) एससीसी ५३९*** या न्यायनिवाड्यावर भिस्त ठेवत आहे. त्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

५. प्रतिवादी क्र.२ ते २० यांना संधी देऊन देखील त्यांनी आपले म्हणणे दाखल न केल्याने प्रस्तुतचा अर्ज त्यांचे म्हणणे विना चालविणेत आला.

६. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले.

७. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

८. प्रस्तुत अर्जाद्वारे त्रयस्थ अर्जदार यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ यांनी वेळोवेळी रक्कम स्वीकारुन त्यांच्या हिश्श्यास येणाऱ्या मिळकतीबाबत खरेदी–विक्रीचा व्यवहार अर्जदार यांचेसोबत केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्याकामी ते आवश्यक व योग्य पक्षकार आहेत. सदरची बाब प्रतिवादी क्र.१ यांनी नाकारलेली असून त्रयस्थ अर्जदार व त्यांचेत कोणत्याही प्रकारचा व्यवहार झाला नसलेचे कथन केलेले आहे. मुळात प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी दावा मिळकतींचे सरस–निरस मानाने वाटप होऊन पृथक कब्जा मिळणेकरीता व

तदअनुषंगीक दाद म्हणून प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीचे सरस–निरस वाटप होईपर्यंत कोणतेही सपाटीकरण किंवा त्रयस्थ इसमांचे अधिकार निर्माण करु नये अशी ताकीद मिळणेकरीता दाखल केलेला आहे. त्रयस्थ अर्जदार यांची कथने पाहता प्रतिवादी क्र.१ यांनी सदरची मिळकत ही सामाईक स्वरुपाची आहे व मिळकतीचे वाटप झाल्यानंतर त्रयस्थ अर्जदार यांना मिळकतीचा पुढील खरेदी–विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्याची हमी दिल्याबाबत मजकूर नमूद आहे. मुळात प्रस्तुत अर्जाचे कारण पाहता हे दावा विषयक मिळकतींच्या वाटपानंतर निर्माण होणारे आहे. त्रयस्थ अर्जदार यांच्या अर्जातील नमुद कारणे पाहता प्रस्तुतचा मुद्दा हा दाव्यातील वाद मुद्दा होऊ शकत नाही किंवा सदरचा मुद्दा प्रस्तुत दाव्यामध्ये निकाली होण्याजोगा नाही. त्याकरीता सदर त्रयस्थ अर्जदार यांना स्वतंत्र दाद मागता येण्यासारखी आहे. सद्यस्थितीमध्ये त्रयस्थ अर्जदार यांनी दावा मिळकतीमध्ये आपले स्वारस्य निर्माण झालेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा प्रस्तुत अर्जाचे अनुषंगाने अभिलेखावर दाखल केलेला नाही. अर्जातील नमुद कारण दाव्याचा वाद विषय नाही किंवा होऊ शकत नाही. त्यामुळे अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे ते प्रस्तुत दाव्यास आवश्यक किंवा योग्य पक्षकार असलेचे दिसून येत नाही. करीता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करता येणारा नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–:: आदेश ::–**

१. अर्ज नामंजूर करणेत येतो.

२. उभय पक्षकारांनी आपआपला खर्च सोसणेचा आहे.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर)

KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2025.02.06 16:03:09 +0530

दिनांकः– ०५/०२/२०२५

(श्रीमती आर.जी.कुंभार)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.